
# गोविंदा आपलं दुकान करतो कोरोना-प्रूफ

भारतीय वैज्ञानिकांचा कोविड-१९ आह्वानाला प्रतिसाद
स्वप्रेरित अनौपचारिक समूह

IndiSciCovid

https://indscicov.in/



Indian Scientists' Response to COVID-19

आज पुन्हा दुकान उघडता येतंय म्हणून गोविंदाला आनंद झालाय. त्याचं वाणसामान-किराणामालाचं दुकान गेले दहा दिवस बंद होतं. फक्त दहाच दिवस झाले? गोविंदाला तर वर्षं उलटल्यासारखं वाटतंय. लोकडाऊनच्या सुरवातीला त्याला सांगण्यात आलं होतं की वाणसामान गरजेच्या वस्तूंमधे येतं, त्यामुळे त्याला दुकान उघडं ठेवायला परवानगी आहे. पण पहिल्याच दिवशी पोलिसांना समजावून सांगण्यात त्याचा इतका वेळ गेला, की त्यानं परत प्रयत्नच केला नाही. दुकान घरापासून लांब, त्याला स्कूटरनं जायला लागतं, आणि पोलीस तर सगळ्या स्कूटरवाल्यांना सरसकट पकडत होते.

गोविंदा शेजारच्या इब्राहिम आणि फर्नांडोशी मधूनमधून बोलतो. तेही त्यांची दुकानं उघडू शकले नाहीत. माल आणायचा कुठून? तिघांचीही दुकानं जेमतेम १० फूट बाय १२ फूट. चिंचोळ्या जागेत जेमतेम एक गिऱ्हाईक ३-४ फूट आतपर्यंत येऊ शकेल एवढीच जागा. त्यांच्या इमारतीत एकूण चार दुकानं -- एक चपलांचं, एक तयार कपड्यांचं, एक गोविंदाचं किराणामालाचं, आणि एक फॅन्सी गिफ्ट शॉप. वरच्या मजल्यावर एक बंद पडलेली इंटरनेट कॅफे, एक न चालणारा फोटो स्टुडिओ, आणि एक शंका वाटावा असा इस्टेट एजंट. सर्वच सध्या बंद. एवढंच नव्हे तर महिन्याभराच्या बंदीमुळे बसलेल्या आर्थिक फटक्यातून हे सगळे डोकं वर काढतील का, हा मोठा प्रश्न. गोविंदाचं दुकान किराणामालाचं असल्यामुळे त्या मानानं बरं आहे.



एरवी गोविंदाचं दुकान पूर्ण दिवसभर उघडं असतं. तो जेवायला घरी जातो तेव्हा त्याचा मुलगा उत्तम दुकानात बसतो. उत्तम फोनवरून ऑर्डर देणाऱ्या काही थोड्या गिऱ्हाइकांच्या घरी माल पोचवायचं काम पण करतो.


लॉकडाऊनची घडी नीट बसल्यावर गोविंदा प्रथम पोलिसांकडे गेला. त्याची कागदपत्र तपासून त्यांनी त्याला दुकान उघडायची परवानगी दिली, आणि दुकान कसं चालवायचं याच्या तपशीलवार सूचनांचा कागद पण दिला.

**गिऱ्हाईकांना आत कसं येऊ द्यायचं?**

एका वेळी फक्त एक गिऱ्हाईक. तसंही गोविंदा आणि उत्तम आत असल्यावर एकापेक्षा जास्त जण मावूच शकत नाहीत त्यांच्या दुकानात.

**बाहेर थांबलेली गिऱ्हाइकं एकमेकांपासून अंतर ठेवतील हे कसं बघावं?**

गोविंदानं दुकानाच्या बाहेर खडूनं सहा-सहा फूट अंतरावर गोल काढले आहेत, आणि लोकांना कळावं म्हणून मोठ्या कागदावर “या गोलांमधेच ठिक्करच्या खेळातल्यासारखं उभं राहावं” अशी सूचना पण लिहून ठेवली आहे. गोल पुसट झाले की ते परत ठळक करायचं काम उत्तमचं.



**दुकानासाठी आलेला माल कसा घ्यावा?**

कोरोनाच्या काळात एरवी आपण एकमेकांपासून जसं अंतर ठेवतो, तसंच माल आत घेतानाही ठेवणं गरजेचं आहे. सध्या तसंही येणारा मालच कमी झालाय, आणि लॉकडाऊनच्या काळात घाऊक बाजारात स्कूटर किंवा बसनं जाऊन माल आणणंही शक्य नाही.

गोविंदा आपलं नाक-तोंड झाकण्याची खबरदारी न चुकता घेतो. त्याच्याकडे घरी धुवून परत वापरण्याजोगे कापडाचे मास्क आहेत. पण हातमोजे वापरा, डोकं झाका, अंगभर कोट वापरा असं सांगितलं तर काय करायचं? सगळी दुकानं बंद असताना हे सगळं आणायचं कुठून? प्रश्न खूप, उत्तरं सध्या नाहीत.



**तसंच गिऱ्हाइकांचं. मास्क घालूनच या अशी विनंती करता येईल, पण सक्ती कशी करायची? पोलीस मदत करतील का?**

त्यानं पेपरात वाचलंय की साबणपाण्यानं या विषाणूंचा नायनाट होतो. साबण तर त्याच्याकडे भरपूर आहे. सतत ताजं साबणपाणी बादलीत भरलेलं राहील आणि दर तासाला सर्व दुकानातले पृष्ठभाग पुसले जातील याची खबरदारी तो घेतो आहे. खोकला असलेल्या कुणालाही मालाजवळ येऊ न देता बाहेरच्या बाहेरच माल द्यायचं त्यानं ठरवलं आहे. उत्तमलाही त्यानं दुकानात काय करायचं आणि काय नाही हे व्यवस्थित समजावून सांगितलं आहे.

जवळपासच्या गिऱ्हाइकांकडे घरपोच माल देणं आता शक्य आहे. लॉकडाऊनच्या काळात उत्तमला सायकलनं लांब पाठवणे शक्य नाही. घरपोच सामान द्यायला जाताना त्याला विशेष काळजी घ्यायला हवी.  उदाहरणार्थ, उत्तम मास्क घालूनच जाणार, दाराशीच माल ठेवून मिळालेले पैसे हात न लावता डब्यात थेट घेऊन परत येणार. त्याला जर खोकला ताप सुरू झाला तर दुकानच बंद करून घरी बसावं लागेल. उत्तम अजून लहान आहे, त्याला या सगळ्याची गंमतच वाटते. गोविंदा मात्र खूप काळजीत आहे.



गोविंदाची आणखी एक मोठी काळजी म्हणजे पूर्ण इमारतीसाठीचा एकच छोटा गलिच्छ संडास. इमारतीत कोणी नाही म्हणून मालकानं तिथली वीज आणि पाणी पण बंद केलं होतं. एका दुकानासाठी ते चालू करून घ्यायला मालकाशी भांडण करणं आलं. गोविंदानं ते पण केलं. येणारं पाणी सध्या कॉफीच्या रंगाचं आणि गढूळ आहे.

अडचणी कितीही असल्या, तरी गोविंदानं गिऱ्हाइकांना शक्य तेवढी चांगली सेवा द्यायची नीट तयारी केली आहे. आता फक्त गरज आहे पुरेसं आणि स्वच्छ पाणी मिळण्याची.

विज्ञानसिद्ध यथातथ्य माहिती लोकांपर्यंत पोचावी म्हणून "भारतीय वैज्ञानिकांचा कोविड-१९ आह्वानाला प्रतिसाद" या स्वप्रेरित अनौपचारिक समूहाकडून ही कथा उपलब्ध करण्यात आली आहे. अशा स्वरूपाच्या आणखी उपयुक्त आणि निःशुल्क माहितीकरता इंटरनेटवर www.indscicov.in इथे जावे.

